सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मुखपत्र

# तरुण भारत

सिंधुदुर्ग

www.tarunbharat.com





# शिरगावच्या संगणक प्रशिक्षणाची 'नॅशनल जिऑग्राफी'वर चित्रफित

**शिरगाव / वार्ताहर ■**

ग्रामीण भागात संगणक प्रशिक्षण कशाप्रकारे दिले जाते, याबाबत माहिती देणारी शिरगाव हायस्कूलमधील संगणक प्रशिक्षण केंद्राविषयीची चित्रफित 'नॅशनल जिऑग्राफी' वाहिनीवर १८ एप्रिलला दुपारी १ ते २ या वेळेत दाखविण्यात आली.

या चित्रफितीत या प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षक एस. एन. अत्तार यांनी केंद्राविषयीची परिपूर्ण माहिती विषद केली. या चित्रफितीचे पुर्नप्रक्षेपण लवकरच करण्यात येणार आहे.

प्रगत देशांच्या तुलनेत भारतातील ग्रामीण भागात संगणकासाठी लागणाऱ्या कोणत्याही सुविधा नसताना देवगड तालुक्यातील शिरगाव येथे 'एनआयआयटी'च्या संशोधनांतर्गत डॉक्युमेंटरी तयार करून संगणक क्षेत्रात येणाऱ्या समस्या दाखविण्यात आल्या आहेत. ही चित्रफित 'एनआयआयटी'चे दिल्ली येथील मुख्य तज्ज्ञ डॉ. सुगाना मित्रा यांनी केली आहे.

ग्रामीण भागात दोन संगणकांवर २५ विद्यार्थ्यांना चांगले प्रशिक्षण कसे दिले जाते, याविषयी यात विवेचन करण्यात आले आहे.

या डॉक्युमेंटरीत श्री. अत्तार यांचे वीस मिनिटांचे मार्गदर्शन आहे. त्यात संगणक प्रयोगशाळा, संगणकासाठी असणाऱ्या सुविधा, अमेरिकेच्या तुलनेत आवश्यक, परंतु भारतातील ग्रामीण भागात उपलब्ध होऊ न शकलेले चांगल्या प्रकारचे शिक्षण कसे दिले जाते, याचे सुंदर चित्रण यात केले आहे. या संगणक प्रशिक्षण केंद्रात इंटरनेट सुविधा थेट उपग्रहाद्वारे एनआयआयटी या संस्थेमार्फत उपलब्ध झाली आहे. या संगणक प्रशिक्षण सुविधेचा सुमारे ५०० विद्यार्थी लाभ घेत आहेत.

42835242

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मुखपत्र

# तरुण भारत

सिंधुदुर्ग

www.tarunbharat.com

आजच्या अंकासोबत खजाना

२+१६ ✦ रु. ३.०० बुधवार दि. २५ जुलै २००७ बेळगाव • गोवा • सिं


# शिरगाव हायस्कूल 'नंबर वन'

## 'किऑस्क' संगणक प्रशिक्षण

शिरगाव / प्रतिनिधी

गेल्या २० वर्षापूर्वी संगणकीय ज्ञान र्वसामान्याला मिळेल काय, याबाबत संभ्रमच ता. मात्र, आज संगणकाच्या युगात 'संगणक' ताळणे म्हणजे आजच्या विद्यार्थी वर्गाचे क्मकारचे खेळणेच झाले आहे. संगणकाद्वारे गाशी संपर्क कसा साधावा, यासाठी दिल्ली थील एन. आय. आय. टी. इंडिया लि. चे ास्त्रज्ञ डॉ. सुगाता मित्रा यांनी 'किऑस्क' या गणक केंद्राची स्थापना केली. भारतात याची कुण ६५ केंद्रे असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात पाच द्रे आहेत. यामध्ये शिरगाव हायस्कूलचे केंद्र ंबर वन' ठरले आहे.

या संस्थेच्या प्रयत्नातून आय. सी. आय. सी. ाय. बँक व मानव साधन विकास संस्था यांच्या ोजन्याने लहान वयातच मुलांना संगणकावरुन गाची ओळख व्हावी, यासाठी 'किऑस्क' हे गणक केंद्र मार्च २००३ मध्ये खासदार सुरेश भू यांच्या प्रयत्नाने सुरू करण्यात आले.

जिल्ह्यात सावंतवाडी तालुक्यातील बांदा, ळवडे, मालवण तालुक्यातील देवबाग, काळसे र देवगड तालुक्यातील शिरगाव अशा पाच ठिकाणी ही केंद्रे सुरू आहेत. एन. आय. आय. . चे शास्त्रज्ञ डॉ. मित्रा यांनी 'किऑस्क' चा ोध लावला. त्यांनी दिल्ली कॅम्पसमध्ये एका भतीला होल पाडून त्यामधून बाहेरचं जग कसे पाहाळता येते, याचे सखोल निरीक्षण केले ाहे. यामुळे जगातील सर्वकाही घडामोडी रबसल्या दिसू शकतात. म्हणून या प्रोजेक्टरला



शिरगाव : येथील 'किऑस्क' संगणकाद्वारे प्रशिक्षण घेताना विद्यार्थी.

'होल इन दी वॉल' असे नाव ठेवले आहे. ही प्रात्यक्षिके दिल्लीबरोबर राजस्थान, जयपूर, जम्मू-काश्मिर याठिकाणी सुरु आहेत.

शिरगाव पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ २००६ पासून स्वखर्चात किऑस्क सेंटर चालवित असून विद्यार्थी संगणकाद्वारे व्हीसॅटद्वारे इंटरनेट, ई- मेल अकाऊंट तयार करणे, चॅटींग करणे, गेम्स आदी सुविधांचा लाभ घेत आहेत. याच केंद्रातील कु. विशाल वळंजू हा कॉम्प्युटर इंजिनिअर असून तो मुंबई येथील सोमया महाविद्यालयात



शमसुद्दीन अत्तार  विजय शेटये

प्रथम आला आहे. तर स्मिता साटम ही सॉफ्टवेअर, इंजिनिअर झाली आहे. चित्रपटातील बालकलाकार अरुण चव्हाण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये बायोटेकमध्ये प्रथम आला आहे. स्वप्नील कदम ॲरोनॅटीक इंजिनिअर (विमाने दुरुस्ती करण्याचे शास्त्र) शिकत आहे. संगणक शिक्षक शमसुद्दीन अत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली ही शिरगाव हायस्कूलची मुले विविध क्षेत्रात चमकली असून या संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे. शिक्षक आमदार रामनाथ मोते, खासदार सुरेश प्रभू, आमदार ॲड. अजित गोगटे, माजी आमदार आप्पा गोगटे, नवीनचंद्र बांदिवडेकर यांच्यामार्फत शिरगाव व कुवळे हायस्कूलला संगणक देणगी स्वरूपात मिळाले आहेत. संगणक विभाग चालु करण्यासाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी राजन चव्हाण, कार्याध्यक्ष आर. व्ही. साटम, अध्यक्ष ॲड. भास्कर साटम, ॲड. शिवाजी साटम, खजिनदार संभाजी साटम, मुख्याध्यापक विलास ऐनापुरे, पर्यवेक्षक विजय कदम यांचा सिंहाचा वाटा आहे. मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी या हायस्कूलचे संगणक शिक्षक शमसुद्दीन अतार, अरुण चव्हाण, स्वप्निल कदम यांनी २००४ मध्ये बालभवन मुंबई येथे एका चर्चासत्रात भाग घेतला होता. त्यांनी पुण्याचे अरुण कुळकर्णी, एन. आय. आय. टी. च्या परिमला इनामदार यांच्या सहकार्याने किऑस्क संगणकाद्वारे विविध शोध निबंध लिहिले असून हे निबंध फेब्रुवारी २००७ मध्ये 'ऑस्ट्रेलियन एज्युकेशन जनरल' या ऑस्ट्रेलियातून प्रकाशित होणाऱ्या मासिकात व फिलीपाईन देशातून 'एज्युकेशन सोसायटी जनरल' मासिकात प्रकाशित झाले होते.

नेदरलॅण्ड विद्यापीठातील फॅन्कली कॅमल हा विद्यार्थी संगणक क्षेत्रातील संशोधन करण्यासाठी गेल्यावर्षी भारत दौऱ्यावर आला असता शिरगाव केंद्राला भेट देऊन येथील विद्यार्थ्यांशी चर्चा करुन शोध निबंध लिहिला होता. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त ज्ञानाचे त्यांनी कौतुकही केले होते.

प्रचंड खपाचे एकमेव हीरकमहोत्सवी दैनिक

# पुढारी

२ रुपये
सिंधुदुर्ग

कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, अहमदनगर, सोलापूर,
सिंधुदुर्ग, रत्नागिरी, बेळगाव व पणजी येथून एकाचवेळी प्रसिद्ध




• वर्ष ६९ • अंक २०२ • सोमवार, २३ जुलै २००७ • पाने सोळा • किंमत २ रुपये

**बदलत्या काळाबरोबर संगणक क्षेत्रात बरीच प्रगती झाली आहे. किंबहुना संगणक हे हातचे खेळणेच झाले आहे. अशा या संगणकाचा पाया खऱ्या अर्थाने ग्रामीण भागात रुजावा, ग्रामीण भागातील मुलांनी स्वतः संगणक कसा हाताळावा. याद्वारे जगाशी कसा संपर्क साधावा. यासाठी दिल्ली येथील एन.आय.आय.टी. इंडिया लि.चे थोर शास्त्रज्ञ सुगात मित्रा यांनी किऑस्क (घखजडध) संगणक केंद्राची स्थापना केली. भारतात याची ६५ केंद्रे असून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५ आहेत. यात शिरगांव हायस्कूल शिरगांवमधील केंद्र सुस्थितीत सुरु असून जिल्ह्यात आदर्शवत ठरले आहे. याच केंद्रातून अनेक विद्यार्थी शिकून नावारुपास आले आहेत. अशीच केंद्रे ग्रामीण भागात अन्य ठिकाणी होण्यासाठी विविध सामाजिक संस्थांनी पुढे येण्याची गरज निर्माण झाली आहे.**

# संगणकावरून मुलांना जगाची ओळख

## शिरगावात किऑस्क संगणक केंद्र

शिरगांव पंचक्रोशी (ता.देवगड) शिक्षण प्रसारक मंडळाने संगणक प्रशिक्षणाचे विविध कोर्सेस सन २००२ पासून सुरु केले आणि यशस्वी करुन दाखविले. या शासनमान्य अभ्यासक्रमात कॉम्प्युटर्स ऑपरेशन बीथ एम.एस.ऑफिस एम. एस. सी. आय. टी. व इतर अनेक प्रकारचे सर्व कोर्सेस यशस्वीरित्या शिकविले जातात. शिरगांव हायस्कूलमध्ये स्व.सुरेश प्रभू, माजी आ.आप्पासाहेब गोगटे, नविनचंद्रबांदीवडेकर यांच्याकडून हे कॉम्प्युटर देणगी स्वरुपात प्राप्त झाले. याच संस्थेच्या कुवळे हायस्कूलमध्ये देखील स्व.सुरेश प्रभूंच्या निधीतून संगणक मिळले आहेत. संगणक विभाग सुरु करण्यासाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी राजन चव्हाण, कार्याध्यक्ष आर. व्ही. साटम, अध्यक्ष ॲड.भास्करराव साटम, चेअरमन ॲड.शिवाजीराव साटम, खजिनदार संभाजीराव साटम तसेच अन्य पदाधिकाऱ्यांचे यात योगदान महत्त्वाचे आहे.

**किऑस्क संगणक केंद्राची स्थापना-** याच संस्थेच्या प्रयत्नातून आय.सी.आय. सी. आय. बँक व मानव साधन विकास संस्था यांच्या सौजन्याने लहान मुलांना संगणकावरुन जगाची ओळख व्हावी. यासाठी किऑस्क संगणक केंद्र मार्च २००३ मध्ये स्व.सुरेश प्रभूंच्या प्रयत्नाने सुरु करण्यात आले. एन. आय. आय.टी. इंडिया लि.कंपनीच्या किऑस्क संगणक केंद्रासाठी मानव साधन विकास संस्थेमार्फत आय. सी. आय. सी.आय. बँकेतर्फे खर्च करत होती. भारतात ६५ केंद्रे असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात बांदा, तळवडे (ता. सावंतवाडी), देवबाग (मालवण), काळसे आणि शिरगांव अशा ५ ठिकाणी ती उभारण्यात आली आहेत.

अशा या किऑस्कचा शोध एन. आय. आय.टी.चे शास्त्रज्ञ सुगात मित्रा यांनी लावला.

अशा या किऑस्क संगणक केंद्राद्वारे मुले इंटरनेट सुविधा, फोन लाईनवर इंटरमिशन, ई-मेल अकाऊंन्ट तयार करणे, एकमेकांशी चॅटींग करणे, निरनिराळ्या वेबसाईटवरुन सर्व प्रकारची वृत्तपत्रे वाचणे, विविध गेम्स शिकता येतात. याच केंद्रातून या हायस्कूलचे विद्यार्थी आज संगणक क्षेत्रात चमकत आहेत.



विशाल वळंजू कॉम्प्युटर इंजिनिअर तर स्मिता साटम ही सॉफ्टवेअर इंजिनिअर झाली आहे. तर बालरंगभूमी आणि चित्रपटातील बालकलाकार अरुण चव्हाण पुण्याच्या फरग्युसन कॉलेजमधून बायोटेकमध्ये प्रथम आला आहे. स्वप्नल कदम ॲरोनॅटिक इंजिनिअर (विमाने दुरुस्त करण्याचे शास्त्र) शिकत आहेत. अशा प्रकारे शिरगांव हायस्कूलच्या मुलांनी या क्षेत्रात गरुड झेप घेवून शिरगांव शिक्षण संस्थेचे नाव रोशन केले आहे. २००६ पासून हे किऑस्क सेंटर शिरगांव पंचक्रोशी शिक्षण प्रसारक संस्था स्वतःच्या खर्चाने चालवित आहे.

**सातासमुद्रापलिकडे शिरगांव झळकला-** गेल्याच वर्षी नेदरलँड येथील विद्यापिठातील फॅन्कली कॅपल हा विद्यार्थी संगणक क्षेत्रातील संशोधन करण्यासाठी भारत दौऱ्यावर आला असताना त्याने या केंद्राला भेट दिली होती. या हायस्कूलमधील विद्यार्थ्यांशी त्याने गप्पा गोष्टी करुन या विषयावर शोध निबंधही लिहिला होता. तसेच त्याने यावेळी मुलांच्या कलागुणांचे कौतुकही केले. मुलांनीही त्याच्याशी चांगलीच दोस्ती केली होती. याचबरोबर या हायस्कूलचे संगणक शिक्षक शामसुद्दीन अत्तार, पुण्याचे अरुण कुलकर्णी, एन. आय. आय. टी. च्या परिमला इनामदार यांनी या किऑस्क संगणकावर निरनिराळे शोध निबंध लिहिलेत.

अशाप्रकारे शिरगांव हायस्कूल संगणक क्षेत्रात अग्रेसर आहे. भविष्यात या हायस्कूलचे अनेक संकल्प आहेत. या हायस्कूलमध्ये संगणक प्रयोग शाळाही सुरु करण्यात आली आहे. याचाच आदर्श घेवून ग्रामीण भागातही अशी किऑस्क संगणक केंद्रे निर्माण होणे अत्यावश्यक आहे.

**संतोष साळसकर**

प्रचंड खपाचे एकमेव हीरकमहोत्सवी दैनिक

# पुढारी

२ रुपये

सिंधुदुर्ग

कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, बेळगाव व पणजी येथून एकाचवेळी प्रसिद्ध





• वर्ष ६९ • अंक १८९ • सोमवार, ९ जुलै २००७ • पाने सोळा • किंमत २ रुपये

## हायटेकमध्ये भिरभिरतंय

# 'शिरगांव'

**'कॉमिट मिडीया फाऊंडेशन मुंबई' या सामाजिक संस्थेचे एक युनिट शिरगांवमध्ये आले होते. या युनिटने विद्यार्थ्यांना दिले जाणारे संगणकीय शिक्षण या विषयांवर एक माहितीपट शिरगांव परिसरात चित्रीत केला. या संपूर्ण माहितीपटाचे चित्रिकरण शिरगांव हायस्कूल व या परिसरात करण्यात आले. या संपूर्ण माहितीपटाचे (डॉक्युमेंटरी फिल्म) सूत्रसंचालन शिरगांव हायस्कूलचे संगणक शिक्षक एस.एस. अत्तार यांनी केले.**



'कॉमिट मिडीया फाऊंडेशन मुंबई या सामाजिक संस्थेद्वारे विद्यार्थ्यांना दिले जाणारे संगणकीय शिक्षण या विषयावर शिरगांव हायस्कूलमध्ये चित्रिकरण करताना कॅमेरामन व दिग्दर्शिका स्वाती देसाई दिसत आहेत. (छाया : अमान इन्फो-शिरगांव)

शिरगांवने आजपर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रात आपला आगळा-वेगळा ठसा उमटविला आहे. कलाक्षेत्र, सामाजिक क्षेत्र, सांस्कृतिक नाहीतर नाट्यक्षेत्र कोणत्याही क्षेत्रात शिरगांव मागे नाही. या शिरगांव भूमीत अनेक कलारत्ने जन्मली. आजच्या पिढीचा विचार केला तर नुकतीच 'देवराई' आणि 'बाधा' या दोन्ही मराठी चित्रपटात याच भूमीतील गौरी चिंदरकर, सचिन मोंडकर, कैलास शेट्ये, अरुण चव्हाण या बालकलाकारांनी आपले गुण दाखविले. त्यामुळे शिरगांव हे चित्रपट क्षेत्रातही गाव झळकले आहे. त्यामुळे शिरगांवची भुरळ चित्रपट क्षेत्राला नक्कीच पडेल असा येथील निसर्गरम्य परिसर आहे. येथील पाडागरमधील सैतवडा धबधबा, आंबेखोलमधील पाझर तलाव ही रम्य ठिकाणे आहेत.

अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत संगणकाचा केला जाणारा वापर या सर्व घटकांचे चित्रिकरण चार दिवसांत पूर्ण केले असून हा माहितीपट येत्या सप्टेंबर महिन्यात प्रदर्शित केला जाईल असे या माहितीपटांच्या युनिटचे प्रमुख श्रीम.चंदीदा मुखर्जी यांनी 'दै. पुढारी'शी बोलताना सांगितले.

दरम्यान २९ मे ते २ जून या कालावधीत लेझली सोहनी सेंटर नासिक देवळाली येथे भारतातील सर्व सामाजिक संस्थांचे एक कृतीसत्र आयोजित करण्यात आले होते.या कृतीसत्रामध्ये या वर्षाची माहिती व दूरसंचार तंत्र या विषयावर व्याख्यान देण्यासाठी शिरगांव हायस्कूलचे संगणक शिक्षण एस.एम.अत्तार यांना निमंत्रित करण्यात आले होते. संपूर्ण भारतामधून अत्तार हे या क्षेत्रातील महाराष्ट्रामधून एकटेच होते. त्यांच्या व्याख्यानाने प्रभावीत होमून सदर चित्रफित शिरगांव येथे चित्रित करण्याचे ठरविण्यात आले. याअगोदर नॅशनल जिऑग्रॉफी या चॅनेलवर एस.एम.अत्तार यांच्यावर चित्रिकरण करण्यात आलेला माहितीपट सन २००५-०६ च्या दरम्यान दाखविण्यात आलेला आहे. शिरगांव हायस्कूलचे संगणक शिक्षक एस.एम. अत्तार यांनी यापूर्वी 'गुगल अर्थ' या वेबसाईटवर शिरगांव-आंबेखोलच्या पाझर तलावाची उंची आणि शिरगांव हायस्कूल उंची काढून या दोन उंचीमध्ये फरकाच्या हिशोबाने विहिरींची पातळी किती आहे, पाण्याची क्षमता किती आहे याचे संशोधन केले. याचे चित्रिकरणही करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना दिले जाणारे संगणकीय शिक्षण या विषयावरचे चित्रिकरण करताना शिरगांव आंबेखोल येथील पाझर तलाव, बाजारपेठ, शेवरे आंबेखोल, कोळोशी येथील साईट चित्रिकरण शिरगांव हायस्कूलमधील बसविण्यात आलेले संगणक केंद्र यावर संगणक हाताळणारे विद्यार्थी त्याचबरोबर शिरगांव हायस्कूलचे संगणक कक्ष त्यात दिले जाणारे शिक्षण यावर गेल्या आठवड्यात ४ दिवसांत चित्रिकरण पूर्ण करण्यात आले.

या चित्रिकरणामध्ये शिरगांव हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांच्याही खास मुलाखती चित्रित करण्यात आल्या. यामध्ये स्मिता साटम, अरुण चव्हाण, स्वप्नील कदम, विशाल वळंजू यांच्या विशेष मुलाखती घेण्यात आल्या. तर संगणक शिक्षक अत्तार यांचीही खास शैलीत मुलाखत मुख्याध्यापक विलास ऐनापुरे, पर्यवेक्षक विजय कदम यांच्याही विशेष मुलाखती या माहितीपटात चित्रित करण्यात आल्या.

सदरच्या माहितीपटासाठी शिरगांव हायस्कूल संस्थेचे अध्यक्ष अॅड.भास्करराव साटम, चेअरमन अॅड.शिवाजीराव साटम, उपाध्यक्ष विठ्ठलराव सावंत, मानद अधीक्षक सत्यविजय चव्हाण, मुख्याध्यापक विलासराव ऐनापुरे, पर्यवेक्षक विजय कदम यांनी मोलाचे सहाकार्य दिले. या माहितीपटासाठी कॉमिट मिडीया फाऊंडेशन मुंबई या समाजिक संस्थेतर्फे युनिट प्रमुख चंदीदा मुखर्जी, कॅमेरामन व प्रसिद्ध माहितीपट दिग्दर्शिका स्वाती देसाई, सहाय्यक ध्वनी साऊंड एडीटर देदू यांचे युनिट शिरगांव हायस्कूलमध्ये दाखल होते.सदरचा माहितीपट येत्या सप्टेंबरमध्ये भारतातील सर्व सामाजिक संस्था व शाळांना विनामुल्य दाखविण्यात येणार आहे. तसेच हा माहितीपट अखिल भारतीय पातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धेत तो प्रदर्शित करण्यात येणार आहे. या माहितीपटासाठी शिरगांव हायस्कूलचे संगणक शिक्षक एस.एम.अत्तार यांनी सूत्रसंचालन केले. या माहितीपटामुळे शिरगांव हायस्कूलमध्ये दिले जाणारे संगणकीय शिक्षण भारतातील सर्व शाळांना आदर्शवत ठरणार अशी प्रतिक्रिया या हायस्कूलचे संगणक शिक्षक एस.एम.अत्तार यांनी 'दै.पुढारी'शी बोलताना दिली.

संतोष साळसकर, शिरगांव